* प्रकरण – सहा *

# उपसंहार

* प्रकरण – सहा *

# उपसंहार

साहित्य आणि संस्कृती यांचे नाते परस्परावलंबित्व स्वरूपाचे आहे. ते जसे परस्परपूरक तसे परस्परपोषक आहे. संस्कृतीचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. समाजातील आंदोलने, सुखदु:खे, समस्या, संकटे तत्कालीन युगधर्म इत्यादींचा आविष्कार साहित्यातून प्रकट होतो. साहित्य आणि संस्कृती यांचे पडसाद एकमेकांवर उमटत असतात. साहित्यात लेखक ज्या समाजात राहतो त्यातील परंपरा, रितीरिवाज, चाली, रूढी या गोष्टी लेखनात येतात. त्याच्या नकळत या गोष्टींचा समावेश साहित्यात होत असतो. त्याचाच मागोवा या प्रथम प्रकरणात घेतला आहे.

प्रथम प्रकरणात 'कुंपणापलीकडले शेत' या कथासंग्रहातील सर्व लेखक हे रूढ अर्थाने लेखक नाहीत. पण समाजातील घटना प्रसंग यांना त्यांना लिहीते केले आहे. हे दिसून येते. लेखकांचे मराठी मन त्यांना गप्प बसू देत नाही म्हणूनच कुमारी माता, नाईटक्लबमधील नग्ननृत्य अशा घटना, प्रसंग लेखकांनी शब्द बद्ध केलेले आहेत. वयस्क माणसे त्यांचे आयुष्य यासारख्या गोष्टी आणि त्याकडे पाहण्याचा त्या समाजाचा दृष्टिकोण व त्यांची संस्कृती या गोष्टींचे ज्ञान आपल्याला या संग्रहातून होते. दिलीप चित्र्यांनी संपादित केलेल्या या कथासंग्रहात या गोष्टींचे वेगळेपण निश्चित जाणवते. या संग्रहातून समाज व साहित्य, संस्कृती या गोष्टी परस्परांवर आधारित आहेत हे स्पष्ट होते. याचा मागोवा आपल्या भारतीय साहित्य व संस्कृती या परस्परावर परिणाम करतात हे स्पष्ट होते.

पाश्चिमात्यांच्या जीवनावर त्यांच्या सामाजिक घटनांवर प्रकाश टाकणारा असा हा चित्र्यांचा कथासंग्रह आगळावेगळाच आहे. या प्रकारचे लेखन साहित्यात अगदी मोजकेच झाले आहे. शिवाय लेखक हे प्रत्यक्षात तिथे वास्तव्यास आहेत. म्हणजे या घटना त्यांनी अनुभवल्या आहेत. असे लेखन तर साहित्यात बघण्यास मिळत नाही. त्यादृष्टीने द्वितीय प्रकरणात विचार करण्यात आला आहे. सगळयात जास्त वेगळेपण म्हणजेच संग्रहाचे वैशिष्टय जाणवते ते

त्यातील आशय व घटना यातून. यातील घटना आपण मनातही आणू शकणार नाही. उदा. 'खजुराहो' या कथेत यामेलाला तिचा नवराच बारमध्ये नग्ननृत्य करण्यास परवानगी देतो. किंवा 'आव्हान' या कथेत नवराच आपल्या बायकोला मित्र आहेत याकडे मुद्दामच दुर्लक्ष करतो व त्यांचे संबंध दुर्लक्षित करतो. अशा आशयामुळे संग्रहाचे वेगळेपण जाणवते.

'फत्तरशीर' या कथेत अपघातासारखी घटना पण तिचा पैसा मिळवण्यासाठी अगदी फत्तरशीरपणे वापर कसा केला जातो हे दिसते. 'कुठे देश माझा' यात वयस्क माणसे समाजात एक अडगळ झालेली आहेत हे दिसून येतात. थोडक्यात आशय व घटना या एकदम भिन्न आहेत.

'शेरी' या (वासंती अभ्यंकर) यांच्या कथेत अशा समाजात राहूनही जोडीदाराशी एकनिष्ट राहणारी शेरी दिसते. म्हणजे प्रत्येक कथा वेगळी आहे. अनुभवाच्या दृष्टीने यातील भाषा सोपी व सरळ आहे. प्रसंग डोळयासमोर उभे राहण्यासाठी छोटया वाक्याचा वापर केला आहे. यात लेखकांना परदेशात जे अनुभव आले त्याचे जसेच्या तसे वर्णन केले आहे. त्यामुळे वाचकाला वास्तवतेचे दर्शन होते. या कथांचे वैशिष्टय म्हणजे यात कुठे खंत, द्वेष, मत्सर दिसून येत नाही. तटस्थपणे वयस्कपणे घटनांचे अनुभवांचे लेखन केले आहे. याचे विवेचन वरील प्रकरणात आहे.

भारत व अमेरिका यांचे शिक्षण व व्यापार आधुनिक जागतिकीकरण या गोष्टींमुळे घनिष्ट संबंध निर्माण झाले आहेत त्यामुळे भारत व अमेरिका किंवा पाश्चात्य देश याचा एक सांस्कृतिक बंधही निर्माण झाला आहे त्यादृष्टीने तिसऱ्या प्रकरणात विचार केला आहे.

आज जगच धावतं बनलेल आहे. वेगवान जीवन पद्धतीमुळे मूल्यांचे संदर्भ बदलत चालले आहेत. पाश्चात्य देशात समाजात राहण्याचे संकेत पूर्ण बदलले आहेत. वेगामुळे तही वेगवान आहेत तिथे कुणाकडे बघण्यास कुणाला वेळ नसतो त्याचमुळे भारतीय समाजात निषिद्ध मानलेल्या गोष्टी तिथे रोजचा दिनक्रम असल्यासारख्या स्विकारल्या जातात. उदा. 'गोष्ट टीना बिशपची' या कथेत नववीत शिकणारी मुलगी तिला दिवस जातात आणि कळस म्हणजे ती आई होऊ इच्छिते. या सगळया गोष्टीचे कुणालाच काही वाटत नाही हे महत्त्वाचे. अशा गोष्टींकडे लोक एक नेहमीची घटना म्हणून पाहतात. व्यक्तीस्वातंत्र्याचा अतिरेक दिसून येतो. त्यामुळे

मोठयांना मान देणे, त्यांचा आदर करणे या गोष्टी कुठेच दिसून येत नाहीत. एकूण समाजातील घटना व त्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोण याचे विवेचन केले आहे.

भारतातही आता आधुनिकतेचे वारे वाहु लागल्यामुळे बऱ्याच सामाजिक गोष्टीवर परिणाम दिसू लागले आहेत. भारतीय समाजात पूर्वीइतकी स्त्रीवर सामाजिक बंधने नाहीत. ती शिथील झाली आहेत. स्त्री अर्थार्जनासाठी बाहेर पडली आहे. आता भारतीय समाजातही मुले स्वत:चे निर्णय स्वत: घेऊ लागली आहेत. प्रेमसंबंधातून विवाह केले जातात. चोरीछुपे विवाहबाह्य संबंध ठेवले जातात.

भारतीय समाजात आता खूप लोक शिकलेले आहेत. या शिकलेल्या लोकांचा एक समाज झालेला आहे की अमेरिकेतील लोकांच्या जीवनाचे अनुकरण म्हणजे आधुनिकीकरण होय. त्यामुळे झपाटयाने हे लोक अमेरिकन पद्धती स्वीकारताना दिसतात. अमेरिकन समाजाप्रमाणे अगदी खुलेआम नसल्या तरी चोरीछुपे सर्व गोष्टी भारतीय समाजातही चालतात एवढाच फरक आहे की अमेरिकन लोकांप्रमाणे या गोष्टींचा गवगवा केला जात नाही तर सगळयाच गोष्टी भारतीय समाजात लपूनछपून केल्या जातात या सगळया गोष्टींचा उहापोह भारत व पाश्चिमात्य देश याचे सांस्कृतिक संबंध एकमेकात गुंफले जात आहेत. भारतीय हे हळूहळू पाश्चिमात्य जीवनशैली अंगिकारत आहेत याचे विवेचन या प्रकरणात आहे.

या कथासंग्रहातील कथांचे लेखक हे रूढ अर्थाने लेखक नाहीत त्याचप्रमाणे ते पाश्चिमात्यही नाहीत. ते व्यवसायासाठी परदेशात वास्तव्यास आहेत. ते मूळचे भारतीय आहेत. त्यामुळे त्यांच्यावर जे संस्कार झाले आहेत ते भारतीय आहेत. एवढया वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी पाश्चात्य जीवनशैली स्विकारली असली तरी त्यांची मने अजून भारतीय संस्कृतीत, भारतीय संस्कृतीची आहेत. त्याचे विवेचन प्रकरण पाचव्यात आहे. हे 'या ऋणानुबंधाच्या' सारख्या कथांमधून दिसून येते तेथील पालकांना आपल्या पाल्यांना पाश्चात्य की भारतीय जीवनशैली दयायची हा प्रश्न पडला आहे. त्याची प्रचिती 'कम्प्युटर पायरसी' सारख्या कथांमधून दिसून येते.

या कथासंग्रहातील लेखक मात्र मनानी अजून भारतीय असल्यामुळे प्रत्येक गोष्टीकडे त्याच दृष्टिकोणातून पाहतात व असे भारतात घडले असते तर काय झाले असते असा विचार

करतात. एकूणच काय तर या लेखकांच्या मनावर भारतीय संस्कृतीचा पगडा जबरदस्त आहे. आणि ती संस्कृती आपल्या दृष्टीने टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. तर काही ठिकाणी हतबल झालेले आहेत. अशी हतबलता हळूहळू भारतीय समाजातही पसरत आहे याचा परामर्श प्रकरण पाचमध्ये घेतला आहे.

भारतीय आपल्या परंपरेनुसार सण, उत्सव साजरे करत होते. पण आधुनिकतेबरोबर हे सण, उत्सव लुप्त होत चालले आहेत. आपणही व आपली संस्कृती हे सगळेच हळूहळू आधुनिक होऊ लागले आहे. भारतीय संस्कृती व पाश्चात्य संस्कृती होत चाललेला बदल याचा अभ्यास प्रकरण पाचमध्ये केलेला आहे.

बऱ्याच रूढी आता कालबाह्य होत आहेत. हळदीकुंकू, गौरी, नागपंचमी यासारखे सण त्यातील खेळ हे सर्व लुप्त होतय. भारतात आंतरजातीय विवाह करणे म्हणजे पाप समजले जात असे त्यामुळे असा विवाह करणाऱ्या मुलांना व त्यांच्या कुटुंबाना वाळीत टाकले जायचे त्यांच्याशी संबंध ठेवले जात नव्हते. पण आता मात्र यात बदल व्हायला लागला आहे. पहिल्यांदा तेवढा विरोध केला जातो व नंतर मात्र सर्व विरोध मावळतो मुलंच आहेत चुकली असतील असं म्हणून हळूहळू त्यांच्याशी जवळीकता साधली जाते. पुन्हा त्यांना समाजात, घरात घेतात. जीवन सुरळीतपणे चालू होत म्हणजे थोडक्यात काय भारतीयांची मानसिकताही या आधुनिकीकरणात बदलत चालली आहे.

भारतातही छोटया कुटुंबाची संकल्पना मूळ धरू लागली आहे त्यामुळे घरात वयस्क माणसांना थारा नाही. पती-पत्नी दोन्ही नोकरदार त्यामुळे घरात मुलांना कुणी सांभाळायचे हा प्रश्न आला. त्यातूनच मुलांच्यावर होणारे संस्कार, त्यांचे योग्य संगोपन अशा अनेक प्रश्नांची मालिका निर्माण झाली आहे. तरुण मुले पाश्चात्यांचे अंधानुकरण करू लागले आहेत. त्यामुळे पाश्चात्याप्रमाणे खाणे, पिणे, वागणे, कपडे या गोष्टी केल्या जाऊ लागल्या आहेत. हे सर्व उच्चवर्गीयामध्ये दिसून येते. त्यांचे अनुकरण मध्यम व खालच्या वर्गात केले जात आहे. दारू पिणे या सारख्या गोष्टीला मान्यता मिळाल्यामुळे मुलं व्यसनाधीन होत आहेत याकडे कुणी लक्षच देत नाही. मोठयांचा आदर करणे ही आपली संस्कृती पण आपली मुल हे विसरू लागली आहेत. उलट ती मोठयांचा अपमान करतात व तुमच्यावेळचे काही सांगू नका त्यावेळचे आता

काही चालत नाही उलट आम्ही करतो तेच बरोबर आहे. अशा विचारांमुळे जीवनावर दूरगामी परिणाम झालेले आहेत.

पूर्वीच्या मानाने भारतीय स्त्री अधिक आत्मनिर्भर व आत्मविश्वासपूर्ण वावरताना दिसते. त्यामुळेच कुटुंबात स्त्री ही आधाराने न जगता स्वयंपूर्ण जगते म्हणूनच ती आता पूर्वीप्रमाणे अन्याय सहन करीत नाही. तिला पुरुषांच्या बरोबरीने स्थान हवे आहे. तिला आपल्या सामर्थ्याची जाणीव झाली आहे. पण पुरुष व त्याची मानसिकता अजून तशीच राहिली आहे. त्यामुळेच स्त्री–पुरुष एक नवीन वाद निर्माण झाला आहे. या वादाचे प्रमाण विकोपाला जाऊन घटस्फोटासारखे प्रकार वाढले आहेत. पूर्वी स्त्रिया समाज, नातलग काय म्हणतील म्हणून सर्व अन्याय सहन करीत होती पण आता स्त्री भित नाही. ती ही माझे आयुष्य माझ्या मर्जीप्रमाणे जगणार असे म्हणताना दिसते प्रत्येक गोष्टीत असा बदल झाला आहे. याचा उहापोह शेवटच्या प्रकरणात केला आहे.

पाश्चात्य संस्कृतीतील व्यक्तिस्वातंत्र्य हे दुधारी शस्त्र भारतीयांच्यातही फिरू लागले आहे. व्यक्तीस्वातंत्र्याचे काही फायदे आहेत जसे निर्णयक्षमता येते. जबाबदारीची जाणीव निर्माण होते. पण व्यक्तीस्वातंत्र्याचा अतिरेक समाजाला विघातक ठरतो. यामुळे मुले स्वत: निर्णय घेतात त्यात मोठयांचे मत विचारत नाहीत. मोठयांचा आदर करत नाहीत. प्रत्येकजण आपल्या मनाला येईल तसे वागतो. इतरांचा विचार करायला वेळच राहत नाही. म्हणजे आपली मूळची त्यागी संस्कृती सोडून भोगवादाकडे चालला आहे हे स्पष्ट दिसते.

समाजात प्रत्येक पालकाला आपला पाल्य या आधुनिक वातावरणात वहात जाईल अशी एक अनामिक भिती निर्माण झाली आहे. ह्या वातावरणात पालकांना असुरक्षित वाटत त्यामुळेच जास्त काही वाईट होण्यापेक्षा झाल हे चांगलं झालं असं मानून बऱ्याच वेळी बऱ्याच गोष्टी मान्य केल्या जातात. काही पालक तर परिस्थितीपुढे हात टेकून काही गोष्टी मान्य करताना दिसतात. म्हणजेच काय तर आता भारतीयांची मानसिकताही हळूहळू परदेशी व्हायला लागली आहे. असे बऱ्याच उदाहरणावरून दिसून येते. पाश्चात्यांच्या अनुकरणामुळे शहरीकरण झपाटयाने होत आहे. प्रत्येक माणूस माझे स्वत:चे एवढाच विचार करताना दिसतो. पाश्चात्यांच्या भोगी वृत्तीने भारतीयांच्या जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलत चालला आहे. हे बऱ्याच गोष्टीवरून स्पष्ट

होते. एकूण भारतीय लोकांच्या वागण्याचे तटस्थ दृष्टीने परीक्षण केले तर बराच फरक पडला आहे हे मान्यच करावे लागेल. हे अंधानुकरण कितपत करायचे हे शेवटी समाज व समाजात राहणाऱ्या व्यक्तींनी ठरवायचे असते. अनुकरण करताना आपल्या मूळ गोष्टी सोडून चालणार नाहीत. चांगल्या गोष्टींचे अनुकरण करण्यास हरकत नाही पण या अनुकरणात आपल्या संस्कृतीतील बऱ्याच चांगल्या गोष्टी आपण विसरत चाललो आहोत त्या काळाच्या ओघात लुप्त होतात की काय अशी भीतीदायक परिस्थिती निर्माण झाली आहे.

या कथासंग्रहातील 'गोष्ट टीना विशपची' किंवा 'पीटरबॅक' आणखी 'कुठे देश माझा' यासारख्या कथा वाचल्यावर प्रथम आपल्याला धक्का बसतो पण थंडपणे विचार केल्यावर लक्षात येते की आपण हळूहळू याच मार्गाने मार्गक्रमण करत आहोत. आतापर्यंत हे अनुभव असे प्रत्यक्षपणे साहित्यात मांडले नव्हते म्हणून एवढा गंभीर विचार केला नव्हता. 'परदेशवास: एक पत्रात्मक चिंतन' कथा वाचल्यावर जाणवते अरेच्या आणखी काही वर्षात ही परिस्थिती भारतातच दिसणार आहे. या सर्वात लक्षात ठेवण्यासारखे वाटते म्हणजे जे कथांचे लेखक आहेत ते राहतात परदेशात व्यवसाय करतात परदेशात पण मनानी अजून भारतीयच आहेत. ते प्रत्येक गोष्टींकडे भारतीय दृष्टिकोनातूनच बघतात हे विशेष, म्हणजे एवढे परदेशात राहूनही त्यांनी भारतीयपण टिकवलं आहे. आणि इथले लोक मात्र इथे राहूनही मनानी पाश्चात्य झालेले आहेत. या पुस्तकातून काही आगळे वेगळे प्रसंग अनुभव वाचायला मिळतात असे प्रसंग इतर कोणत्याही पुस्तकात वाचायला मिळत नाही. मुळातच आपल्या साहित्यात या प्रकारचे लेखन उपलब्ध नाही. त्यामुळेच वाचताना आपल्याला धक्क्यावर धक्के बसतात. असे आगळे वेगळे पुस्तक वाचताना वेगळाच आनंद मिळतो. एकूणच ही पाश्चात्यकरणाची लाट आपल्याकडे सरकली आहे हे दिसून येते. त्यातील प्रसंग, आशय हे वेगळे आहेत त्यांचे वेगळेपण हेच पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे.

## संदर्भ सुची


| | | |
|---|---|---|
| १. | आचवल माधव | "रसाग्वाद" वाङ्मय आणि कला<br>दि.वा.आमोणकर. मुंबई १९७२ |
| २. | जोग रा.श्री. | मराठी वाङ्मयाचे विहंगलोकन<br>पहिली आवृत्ती १९५९<br>पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| ३. | गाडगीळ गंगाधर | "साहित्याचे मानदंड"<br>पहिली आवृत्ती १९६२<br>पॉप्यूलर प्रकाशन मुंबई |
| ४. | जोग रा.श्री. | मराठी वाङ्मयाचा इतिहास<br>खंड चौथा<br>पहिली आवृत्ती १९६२<br>महाराष्ट्र राष्ट्रीय परिषद, पुणे |
| ५. | काणे पांडुरंग वामन | "युरोपचा प्रवास"<br>भारत गौरव ग्रंथमाला<br>पुष्प १३५वे मुंबई १९३८ |
| ६. | देशपांडे कुसुमावती | "मराठी कादंबरीचे पहिले शतक"<br>दुसरी आवृत्ती १९७५<br>मराठी साहित्य संघ |
| ७. | देशपांडे अ.ना. | "आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास"<br>दुसरी आवृत्ती १९५८<br>व्हीनस प्रकाशन, पुणे |
| ८. | जोशी अ.म. | "प्रदक्षिणा"<br>पाचवी आवृत्ती १९७२<br>कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे-३० |

९. जोग ग.श्री. — "मराठी वाङ्मयाचा इतिहास"
दुसरी आवृत्ती १९७३
प्रकाशक- डॉ. भिमराव कुलकर्णी
सरस्वती मुद्रणालय, भोसरी पुणे-२६

१०. शेवडे इंदूमती — "मराठी कथा उद्गम-विकास"
सोमैय्या प्रकाशन मुंबई १९७३

११. चित्रे दिलीप वि. — "कुंपनापलीकडले शेत"
श्रीविद्या प्रकाशन, पुणे

१२. कवटेकर बाळकृष्ण — "वाङ्मयीन चर्चा आणि चिकित्सा"
नवसाहित्य प्रकाशन, बेळगाव १९७८

१३. कुरुंदकर नरहर — "धार आणि काठ"
श. ज. देशमुख
पुणे १९७१

१४. कुलकर्णी गो.म. — "रसग्रहणः कला व स्वरूप"
दा. ना. मांघे
कोल्हापूर १९५८

१५. कुलकर्णी गो.म. संपादक — "नवसमीक्षाः काही विचारप्रवाह"
मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे १९८२

१६. कुलकर्णी गो.म. — "खंडन-मंडन"
पॉपूलर प्रकाशन, मुंबई १९६८

१७. कुलकर्णी द. भि. — "दोन परंपरा"
विजय प्रकाशन, नागपूर १९९३

१८. गाडगीळ गंगाधर — "खडक आणि पाणी"
पॉपूलर प्रकाशन, मुंबई

१९. जोग ग.श्री. संपादक — "मराठी वाङ्मयाचा इतिहास"
खंड पाचवा, भाग पहिला
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे १९७३

२०. देशपांडे मा.का. — "साहित्यसाधना"
कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९६१

२१. देशपांडे वि.भा. व संपादक तावरे स्नेहल — "मराठी भाषा आणि साहित्य"
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९९०

२२. धोंगडे रमेश व धोंगडे अश्विनी — "मराठी भाषा आणि साहित्य"
दिलीपराज प्रकाशन, पुणे १९९१

२३. नेमाडे भालचंद्र — "टीका स्वयंवर"
संकेत प्रकाशन
प्रा.लि. औरंगाबाद १९९०

२४. पाटणकर रा.भा. — "सौंदर्य मीमांसा"
कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे १९८१

२५. वेडेकर दि.के. — "समाजचिंतन"
पॉप्यूलर प्रकाशन मुंबई १९६९

२६. वेडेकर दि.के. — "साहित्यविचार"
पॉप्यूलर प्रकाशन मुंबई १९६४

२७. भागवत दुर्गा — "धर्म आणि लोकसाहित्य"
पॉप्यूलर प्रकाशन मुंबई १९७५

२८. मालशे स.ग. (अनु) — "साहित्यसिद्धांत"
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे १९८८

२९. वाळिंबे श.श. — "साहित्याचा ध्रुवतारा"
मनोहर महादेव केडकर
मनोहर ग्रंथमाला पुणे १९४५

३०. सरदार गं. बा. संपादक — "महाराष्ट्र जीवनः परंपरा आणि समस्या" खंड दुसरा मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन पुणे १९६०

३१. सरदार गं. बा. संपादक — "महाराष्ट्र जीवनः परंपरा आणि समस्या" खंड पहिला मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन पुणे १९६०

३२. सहस्त्रबुद्धे पु. ग. — "महाराष्ट्र संस्कृती" कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९७९

३३. संत दु. का. — "ललित कला आणि ललित वाङ्मय" फडके बुकसेलर्स, कोल्हापूर १९८८

३४. क्षीरसागर श्री. के. — "साहित्याच्या दरबारात" सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर १९२१

३५. फडकुले निर्मलकुमार — "काही रंग काही रेषा" मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९८६